
जून २०२१

पर्यावरण ध्यास पर्यावरण श्वास



# पर्यावरणाच्या वाटेवर

Fresh Ink Advertising

# पर्यावरणाच्या वाटेवर

मुख्य संपादक : Fresh Ink Advertising

**मुखपृष्ठ**

अमोल गवळी

**मांडणी,सजावट**

वैभव गवळी

**आवृत्ती**

जून २०२१

**किंमत**

रसग्रहण


Contact : +917767041449
Email Id : fi@freshinkadvertising.com
www.freshinkadvertising.com

चिपको आंदोलनाचे प्रणेते

स्व. सुंदरलाल बहुगुणा यांना विनम्र अर्पण

# मनोगत

प्रत्येक मनुष्याला निरामय आयुष्य जगण्याचा अधिकार आहे मात्र स्वतःहाच्या चुकांमुळे त्याला त्याचं प्रायश्चित्त भोगावं लागत आहे जसं की वृक्षतोड, पर्यावरणाचा असमतोल, प्रदुषण आणी निसर्गाविषयी कमालीची उदासीनता त्यातच पर्यावरण संबधी विषयी जागरुकतेचा व काही प्रमाणात अज्ञानसुध्दा तितकेच जबाबदार ठरतात. पर्यावरणाचा समतोल राखल्याने नैसर्गीकरित्या ऑक्सीजन भरपूर प्रमाणात मिळतो तोच प्राणवायू जीवनदान देत असतो. पर्यावरण दिनाचं औचित्य साधून 'फ्रेश इंक' ने पर्यावरणाला पूरक व एका अर्थाने समर्पित व कर्तव्य भावनेतून 'पर्यावरणाच्या वाटेवर' हा विषेशांक प्रकाशित करण्याचा त्यांचा हा प्रयत्न स्तुत्य आहे की नाही तो ठरवण्याचा अधिकार सर्वस्वी आपला आहे. सांगायला अत्यंत अभिमान वाटतो की ह्या विशेषांकासाठी देशा-विदेशातून साहित्य आम्हांला प्राप्त झाले त्यातून निवडक व दर्जेदार साहित्य, व्यंगचित्र व छायाचित्राची आम्ही निवड केली त्यापाठीमागचा हेतू हा की विशेषांक हा केवळ नावापूरताच न राहता ती ख-या अर्थाने पर्यावरणरुपी वाट बनून आपलं ध्येय गाठता यावं.

विशेषांकासाठी दिलेल्या सहकार्याबद्यल धन्यवाद.

डॉ. रामदास गवळी

लेखक, कवी, गीतकार

मे. ऑफ. फिल्मरायटर. असो. (मुंबई)

# अनुक्रमणीका


व्यंगचित्रे - ईसाबेला विझोरेक (पोलंड)

व्यंगचित्रे - एच ओझकॅन (तुर्की)

पर्यावरण एक स्वयंशिस्त - मटगोना एल (इटली)

दोन शब्द पर्यावरणासाठी - डॉ. विष्णू सुरासे

मी वसुंधरा - अभिमन्यू राजगुरू

तुकोबांचे-पर्यावरणवाद व अध्यात्म - डॉ. वाल्मिक गवळी

बचत हीच निर्मीती - शंकर जोगदंड

गरज पर्यावरण शिक्षणाची - अमोल गवळी

उपक्रम - आशिष दाबके

निसर्गाचा अविष्कार - एस. रऊन


इतिहासाच्या गर्भात


बघावे असे काही



ईसाबेला विझोरेक (पोलंड)

चित्रकार, व्यंगचित्रकार, 55 पेक्ष्या जास्त
आंतरराष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित


ikw

ikw

ikw

ikw



**एच ओझकॅन** ( तुर्की )

**चित्रकार, व्यंगचित्रकार, 30पेक्ष्या जास्त आंतरराष्ट्रीय पुरस्कारने सन्मानित**

# पर्यावरण एक स्वयंशिस्त



पर्यावरणाच्या संवर्धनासाठी
सर्वात आवश्यक आहे
स्वच्छता आणि व्यवस्थापन
वैयक्तिक स्वच्छते बरोबर
पर्यावरणाची स्वच्छता खूप
महत्वाची आहे, इथे इटली मध्ये
रस्ते सार्वजनिक ठिकाणे स्वच्छ आणि
सुंदर आहे रस्त्यावर कचरा टाकतांना
कुणी दिसत नाही विदयार्थ्यांना शालेय वयात
पर्यावरणाबाबत जागरूकता निर्माण केली जाते
स्वच्छते बाबत इटलीतील शाळा कठोर शिस्तिच्या
आहे .
विद्यार्थ्यांना शिस्त लावणे सोपे आहे
पण जबाबदार नागरिक बेशिस्त वागतात
कच-याचे व्यवस्थापन प्रक्रिया यामुळे प्रदुषण
रोखण्यास ब-याच अंशी मदत होते
माझ्या गार्डन मध्ये आम्ही विविध प्रकाराची झाडे
लावली आहे, उर्जा देणारी माझी प्रत्येक सकाळ रंगबेरंगी
आणि आनंदी असते
माझी मुलगी रोम जवळील एका छोटया जंगलात
रहाते, शहराच्या बाहेर निसर्गाच्या सानिध्यात
ति एक निसर्गप्रेमी आहे . तिचा जंगलात राहण्याचा
निर्णय आम्हाला प्रेरित करतो .

मटगोना एल (इटली)
चित्रकार, निसर्गप्रेमी

# दोन शब्द पर्यावरणासाठी



माणसाच्या जगण्यात
पर्यावरणाचा महत्वाचा
वाटा ... आज आपण
सर्वजण त्याचा अनुभव घेत
आहोत..ऑक्सीजन
मिळवण्यासाठी लोकांना
किती संघर्ष करावा लागला...
वेळेवर ऑक्सिजन
मिळाला नाही म्हणून अनेकांना आपले प्राण
गमवावे लागले ... जगणं सुंदर करायचं असेल तर
पर्यावरण चांगलं असणं आवश्यक आहे ... निसर्ग
डोळे भरुन पहायला आवडतो ... फोटोही
काढायला आवडतात ... पण झाडं लावा म्हटलं
की फारसं कुणी पुढे येतानां दिसत नाही...
जे लोक झाडांना जपतात... संवर्धन करतात त्यांना
माझा सलाम आहे ... पर्यावरणात जर काही
बदल झाला तर त्याचा परिणाम मानवी जीवनावर
होतो ... वायू प्रदुषण ... ब-याच प्रमाणात होतांना
दिसतंय ... एकंदरीतच विचार करायचा झाल्यास
पर्यावरण आणि मानवी जीवन या एकाच
नाण्याच्या दोन बाजू आहेत ... म्हणूनच प्रत्येकाने
जगतांना पर्यावरणाचे संतुलन कसं राखता येईल
यासाठी प्रयत्न करणं गरजेचं आहे.

हास्यकवी : डॉ . प्रा . विष्णू सुरासे

# मी वसुंधरा



हे माझ्या लेकरा
मी वसुंधरा बोलते आहे...
तुझ्या बेफिकीर खटाटोपापायी
मी दिवसेंदिवस खंगते आहे
लोखंडाला कमजोर करणा-या
बुरशीप्रमाणे...

माझा हिरवा शालूही
तू फाडतो आहे कायम
हिंस्र श्वापदे लचके तोडतात ना
अगदी तसे आणि
उभारतोय दिखाऊ सिमेंटच्या
निर्जीव वास्तु...

तुला तुंबलेली प्रदूषणची,दुर्गंधीची
नदी दिसत नाही

तरीही वाहते आहे
तुझ्या कर्माचे कर्ज-व्याज
नेसून अविरतपणे
तुझ्याकडून परतफेडीचा तर किरणही
धूसर...

मळकटतो आहे चेहरा माझा
फुफाटयासारखा विद्रुपही भासतो आहे
जळाल्यासारखा तुझा बेगडीपणाचा आव
पाहून

भारही वाढतो आहे
प्रत्येक सेंकदागणिक तरीही पेलतेच आहे
माझ्या बाळा तुझ्या रूपाचा हाडांमांसाचा
कृतघ्न गोळा...
लेकरा तू ,

एक ना अनेक प्रश्नांचे चक्रव्यूह
तुच तुझ्यासाठी निर्माण करतो आहेस
विकासाच्या,स्वार्थाच्या हव्यासापायी...
आता तर माझे अस्तित्व संपवून कृत्रिम
ऑक्सीजन विकतो आहे विकत घेतो आहे
व्यवहारी बनून... कारण तुला महासत्ता
बनायचे आहे ना जैविक विषारी वायू
पसरुन तुझ्याचसारख्या दिसणा-या माणसाला
मारून...

म्हणजे तुला, तुलाच संपवायचे आहे का ?
पण या सा-या गदारोळात तु माझी
सुंदर कलाकृती आहे

हे मात्र तू नक्की
विसरला... बाळा, तुला शेवटचे सांगणे आहे
कारण तू माझं बाळ आहे
आणि मी तुझी आई
अजूनही थोडा विचार कर
आणि सोडव तू पेरलेले अगणित प्रश्न
न सुटणारे, न उमगणारे
नसता एक होती पृथ्वी
एक होता माणूस
अशी म्हणण्याची वेळ येऊ नये ?

अभिमन्यू राजगुरू
(कवी, गीतकार)

# तुकोबांचे - पर्यावरणवाद व अध्यात्म

पर्यावरण आणि मानव यांचा परस्परपूरक संबधं तर आहे, किंबहुना निसर्ग हा मानवी जीवनाचा अविभाज्य घटकही आहे. मानवाने प्रचंड अशी कांती करताना निसर्गाचा केलेला अनाठायी वापर आणि त्याला भोगावे लागणारे दुष्परिणाम आज आपण पाहतोच आणि 'पर्यावरण वाचवा' असा संदेश द्यावा लागतोय, परंतु सुमारे साडेतीनशे वर्षापूर्वी दूरगामी पणाने संत तुकारामांनी आपल्या अभंगातून हाच संदेश सोप्या शब्दात भक्तिमार्गाव्दारे दिला तो मानवास आजही अतिशय उपयोगी पडत आहे. पर्यावणाचे संरक्षण, त्याचा सहवास, निसर्गाचे मानवी जीवनात असणारे महत्व असे नानाविध घटक तुकोबांनी आपल्या अभंगातून साकारले पर्यावरण आणि भूगोलाला त्यांच्या प्रतिभेने स्पर्श केला त्यामुळेच तर व्यवहार आणि परमार्थ साधणारे तुकोबा समतावादी पर्यावरणी संत म्हणूनही ओळखले जातात.

त्याकाळी कोणतेही शास्त्र विकसित नसतांना स्वतःच्या प्रज्ञेच्या व ज्ञानाच्या आधारावर त्यांनी अनेक संज्ञा मांडल्या त्या आजही किती आधुनिक वाटतात. तुकोबांना भौगोलिक परिस्थितीची अत्यंत अचूक माहिती होती वा-यावरुन सकाळ,दुपार संध्याकाळ झाली का ते कळते म्हणजेच निसर्ग आपल्याला शिकवतो अस तुकोबा म्हणायचे तुकारामांनी आपल्या अभंगातून अनेक सुंदर निसर्ग चित्रे रेखाटली निसर्गाशी ते इतके एकरूप होऊन जात की निसर्गातील प्रत्येक घटक त्यांना आपले सोयरेच वाटतात 'सोयरे' या शब्दामागे ही त्यांचा विशाल दृष्टिकोन त्यांच्या सुप्रसिध्द पुढील अभंगात लक्षात येतो.

वृक्षवल्ली आम्हां सोयरे वनचरे। पक्षीही सुस्वरे आळविती॥ येणे सूखी रुचे एकांताचा वास। नाही गुणदोष अंगा येत॥ आकाक्ष मंडप प्रथिवी आसन। रमे मन क्रीडा करुं॥

तुकोबा निसर्गाशी इतके एकरुप होतात की वृक्ष, वेली, पशु आणि पक्षी हे जणू आपले नातलगच आहेत व आकाश हा मंडप असून पृथ्वी आमचे शासन आहे, अशा सुंदर, आनंदी वातावरणात आपण हरी कथा, नामस्मरणात रमून गेलो पाहिजे, असा निसर्गाशी अध्यात्मिक अर्थ तुकोबांनी अभंगातून सांगितला, हरि कथा भोजन परवडी विस्तार। करोनि प्रकार सेवू रुची॥ तुका म्हणे होय मनाशी संवाद।आपुलाचि वाद आपणासी॥ सृष्टी आणि तुकाराम यांच्यात एक जैविक नाते हे नाते त्यांच्या अनेक अभंगातून व्यक्त होते, चराचर सृष्टीशी एकरुप होणारे तुकोबांचे व्यक्तिमत्व यातून प्रकट होते, संत तुकाराम निसर्गाचा माणसाशी संबंध जोडून त्यातच चांगल्या वाईट गोष्टी ओळखतात अभंगाच्या माध्यमातून मनाच्या संवादापासून लोकसंवादापर्यंत त्यांनी पर्यावरण संस्काराचे अनुस्यूत ध्येय जनसामान्यापर्यंत पोहोचविण्याचे कार्य केले.

डॉ. वाल्मिक गवळी
नेहरू मा. व उच्च मा. विद्यालय
सावखेडा औरंगाबाद.

# बचत हीच निर्मीती



आपण फक्त पर्यावरण दिनीच झाडे
लावतो परंतु त्याचे नंतर संगोपन होतो का ?
आपण स्वतः पासून सुरुवात करायला हवी नैसर्गिक
साधन संपत्तीचे महत्व समजायला हवे त्याच्या
बचतीची नितांत आवश्यकता आहे आपल्याकडे
विज बिल भरायला जरी पैसे असले तरी वीज
निर्मीतीसाठी मोठया प्रमाणावर दगडी कोळसा लागतो
नैसर्गीक साधन संपत्तीचा वापर जपून करायला हवा
बचतीचे मार्ग शोधून आपण अंबलबजावनी केली पाहीजे
आवश्यकता नसेल त्यावेळी विजेची । उपकरने बंद ठेवणे,
सौर उर्जेचा प्रभावी वापर, अशा पध्दतीने उर्जा बचत
करावी कारण
बचत म्हणजेच नवनिर्मीती

शंकर जोगदंड
निसर्गप्रेमी

**पर्यावरण दिनाच्या हार्दिक शुभेच्छा**

# गरज पर्यावरण शिक्षणाची

पर्यावरण हा मानवी जिवनाचा अविभाज्य अंग आहे
पर्यावरणाचा असमतोल झाल्यास जगणे अशक्य होईल
पर्यावरणाचा समतोल, त्याचं संवर्धन राखण्यासाठी
त्याचे महत्व समजण्यासाठी त्याची सुरुवात ही
शालेय जिवनापासुनच व्हायला हवी
त्यासाठी पर्यावरणशास्त्राचा अभ्यास हा गांभिर्यपुर्वक
करायला हवा पण सध्यातरी तसे कुठे दिसत नाही
पहिले पर्यावरण विषयक पुस्तक जॉर्ज पर्किन व मर्श यांचे
मॅन व नेचर हे आहे त्यामध्ये साधनसंपत्तीचा वापर व त्याचे
विपरीत परिणाम यावर चर्चा केली आहे
कुठलेही कार्य यशस्वी होण्यासाठी
त्याविषयी जागृती, प्रेरणा त्याचे फायदे तोटे
या विषयी माहिती करुन देणे आवश्यक
आहे आणि त्याची
जबाबदारी आपल्या सर्वावर आहे
थोर शास्त्रज्ञ जगदिश चंद्र बोस
यांनी वनस्पतीनां संवेदना असतात हे
प्रयोगानिशी सिध्द केले आहे
पण आपण वृक्ष तोडतांना इतके संवेदनहिन का होतो ?
निसर्ग आपल्याला दोन्ही हातांनी
भरभरून देण्यासाठी तयार असतांना
आपण इतके दुर्भाग्यशाली का रहावे

अमोल गवळी

# पर्यावरण व दायित्व

मला निसर्ग नेहमीच आकर्षित करत आला आहे
पर्यावरणाविषयी आंतरिक ओढ मला ह्या कामाप्रति
सदैव प्रेरित करतो हळू-हळू मी त्याला व्यापक रूप
कसं देता येईल ह्या अनुशंगाने गांभिर्याने विचार केला
त्यातून मला काही वृक्ष प्रेमी मित्रांचे सहकार्य मिळाले
आणी त्यातूनच आम्ही निसर्गप्रेमी समूह नावाचा ग्रुप
स्थापन केला आणी ह्या कामाची मूहर्तमेढ रोवली
हे काम खर तर आनंद व समाधान देणारचं आहे
त्यामुळे प्रत्येकाला आपला नोकरी व्यवसाय सांभाळून
करणं शक्य आहे ह्यासाठी आम्ही निसर्गाचे जतन
व संवर्धन हा उपक्रम हाती घेतला लोंकाना निसर्गाच
महत्व पटवून देत गेलो त्यासाठी सार्वजनिक ठिकाणी
वृक्षारोपण चा कार्यक्रम ही हाती घेतला त्यामूळे उजाड
माळराण फुलत गेलं त्यानंतर उन्हाळयातील प्रचंड
दाहकता व पक्षांची अन्न व पाण्यासाठी होणारी
भटकंती व व्याकूळता लक्षात आली त्यासाठी 'बर्ड फिडर'
ची कल्पना सूचली त्यामूळे प्रत्येक जण आपल्या
घरावर, छतावर व गच्चीवर बर्ड फिडर चा उपयोग
करुन पक्षासाठी पाणी व खाद्य सहज उपलब्ध करु
शकतो त्यामुळे घरावर येणा-या पक्षांचे थवे जेंव्हा तृप्त
होतात तेंव्हा झालेल समाधान खरतर शब्दातीत आहे
ह्याच माध्यमातून वेळोवेळी औचित्य साधून पर्यावरणाविषयी
परिसंवाद आयोजित केल्या जातो त्यामूळे सतत निसर्गाच्या
सानिध्यात राहण्याचा आनंद मिळतो

आशिष दापके

# निसर्गाचा अविष्कार





निसर्गप्रेमी एस . रऊन यांनी " स्वित्झर्लंड " येथून खास फ्रेश इंक साठी पाठविले काही छायाचित्रे.

# इतिहासाच्या गर्भात




WHAT'S THE SCORE?
DUST-60
Sulphur Diox-43
AIR
POLLUTION
KILLS
BREATHING
IS
DANGEROUS
TO YOUR
HEALTH



# DOCUMENTARY FILM

1. **Global Warming The Future - Full Documentary 2019 HD**

   https://www.youtube.com/watch?v=uOMRF7t5Vn0

2. **Western Ghats Programme**

   https://www.youtube.com/watch?v=pGGqrRBU2xk

3. **Our Planet**

   https://www.youtube.com/watch?v=cTQ3Ko9ZKg8

4. **Save Us**

   https://www.youtube.com/watch?v=aCa9UArRDLo

5. **99¢ | A Short Film About the Environment**

   https://www.youtube.com/watch?v=IECg3mqchzY

Source- Youtube

# धन्यवाद !

निसर्ग व पर्यावरण मानवी मनाला
नित्य आकर्षित करत असतं
निखळ आनंदाचा अखंड
वाहणा-या झ-याचं उगमस्थान
जर कूठ असेल तर ते
निसर्गाच्या कुशितच, निरामय जीवनाचा
अविरत स्त्रोत म्हणजे निसर्ग.
निसर्ग मानवाला भरभरून देत
असतो आपण आपल्या कवेत
त्याला घ्यायचं असतं
आपल्यात सामावून घ्यायचं असतं

मनसोक्त व मनमुराद आनंदाची लयलूट
हा विशेषांक केवळ निमीत्तमात्र.

Fresh Ink Advertising
Contact : +917767041449
www.freshinkadvertising.com Email Id : fi@freshinkadvertising.com